CMYK

बीड । शनिवार

०८.०३.२०२५

वर्षे : ४ अंक : ३२९

किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 



# २०० च्यांवर शिकारी, 'खोक्या'चा 'करेक्ट कार्यक्रम' होणार ?

## पोलिसांपाठोपाठ वनविभागानंही पावलं उचलली

**बीड । प्रतिनिधी**

भाजप आमदार सुरेश धस यांचा निकटवर्तीय सतीश भोसले ऊर्फ 'खोक्या', याचे एक-एक कारनामे समोर येऊ लागले आहेत. बॅटने मारहाणी केल्याचा व्हिडिओ समोर आल्यापासून, त्याची परिसरातील दहशत चर्चेत आली आहे. तसेच नोटांचा बंडलांशी खेळताना व्हिडिओ समोर येऊ लागले आहेत.

याशिवाय परिसरात असलेल्या डोंगराळ भागात त्याने केलेल्या हरिण, मोर, ससे, काळवीट यांच्या शिकारीचे किस्से समोर आले आहेत. बीड पोलिसांची दोन पथकं मागावर असतानाच, त्या वन विभागाचे पथक देखील वन्यप्राण्यांची शिकार केली म्हणून मागावर लागलं आहे. वन विभागाने त्याच्याविरोधात स्वतंत्र गुन्हा नोंदवण्याची तयारी केली आहे.

सतीश भोसले याने दोन दिवसांपूर्वी बॅटने मारहाण केल्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर चांगलाच व्हायरल झाला. यानंतर तो भाजप आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता निघाला. यामुळे बीडमधील राजकीय गुन्हेगारी पुन्हा चर्चेत आली आहे. सतीश भोसले हा पसार असून, त्याच्या मागावर पोलिस पथक आहे.

दरम्यान, सतीश भोसले याची परिसरातील दहशत आता एका-एका व्हिडिओच्या माध्यमातून समोर येऊ लागली आहे. पैशांच्या बंडलांबरोबर त्याचा व्हिडिओ समोर आले आहेत. तसेच बीडमधील शिरूर, बावी इथल्या डोंगराळ भागात तो हरण, काळवीट, ससे, मोर अशा वन्यप्राण्यांची शिकार करायचे हे देखील समोर आले. २०० पेक्षा जास्त वन्यप्रमाण्यांची त्याने शिकार केल्याचे सांगितले जात आहे. शिकारीला विरोध करणाऱ्यांना तो टोळक्याने जाऊन मारहाण करायचा, हे देखील समोर आले आहे. वन विभागाने या प्रकाराची गंभीर दखल घेतली, असून त्याविरोधात स्वतंत्र गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू केली आहे. यासाठी शिकार केलेल्या ठिकाणी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी तपासणी केली. काही ठिकाणी शिंग, हाड देखील सापडली आहेत. शिकारीसाठी ज्या ठिकाणी जाळ लावयचा, ते ठिकाणं देखील स्थानिकांनी दाखवले आहेत. त्यामुळे सतीश ऊर्फ खोक्याविरुद्ध वनविभागाने कारवाईचा फास आवळणार असल्याचे संकेत दिले आहे. सतीश भोसले याला हरणाच्या शिकारीचा विरोध केला म्हणून, महेश ढाकणे आणि दिलीप ढाकणे या पिता-पुत्रांना गंभीर मारहाण केली होती. दिलीप ढाकणे यांना एवढी जबर मारहाण केली की, त्याचे आठ दात पाडले. त्यांचा मुलगा महेश ढाकणे यांचा पाय कायम स्वरूपी जायबंदी केला आहे. सतीश भोसले हा बेपत्ता असून, त्याच्या शोध घेण्यासाठी पोलिसांनी दोन पथक मागावर आहेत. आता वन विभागाने सतीश भोसलेविरोधात स्वतंत्र कारवाईचे संकेत दिले आहेत.

# 'भ्रष्ट राजकारणी अन् अधिकारी भाडोत्री मारेकऱ्यांपेक्षा जास्त धोकादायक'

**● सर्वोच्च न्यायालयाची कठोर टिप्पणी**

**वृत्तसंस्था**



सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचारावर सर्वोच्च न्यायालयाने कडक टीका केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले सरकार आणि राजकीय पक्षांच्या सर्वोच्च स्तरावर बसलेले भ्रष्ट अधिकारी भाडोत्री मारेकऱ्यांपेक्षा समाजासाठी जास्त धोकादायक असतात. अशी कठोर टिपण्णी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे.

न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांनी एका प्रकरणावर सुनावणी करताना जर विकसनशील देशातील समाजाला कायदा आणि सुव्यवस्थेसाठी भाड्याने घेतलेल्या मारेकऱ्यांचांपेक्षा मोठी समस्या भेडसावत असेल तर ती सरकार आणि राजकीय पक्षांमध्ये उच्च पदांवर बसलेले भ्रष्ट अधिकारी आहेत. भ्रष्टाचाराला अनेकदा शिक्षा न होता वाढू दिले जाते.

पंजाब सरकारमधील ऑडिट इन्स्पेक्टर देविंदर कुमार बन्सल यांचा अटकपूर्व जामीन फेटाळताना खंडपीठाने ही कडक टिप्पणी केली. बन्सल यांच्यावर ग्राम पंचायतीने केलेल्या विकासकामांचे ऑडिट करण्याच्या बदल्यात लाच मागितल्याचा आरोप आहे. भ्रष्टाचाराच्या मूळ स्वरूपाचा निषेध करताना, खंडपीठाने म्हटले आहे की, जर एखाद्याला विचारले गेले की आपल्या समाजाच्या समृद्धीच्या दिशेने प्रगती रोखणारा एकमेव घटक कोणता आहे, तर तो निःसंशयपणे भ्रष्टाचार आहे. न्यायालयाने म्हटले आहे की भ्रष्टाचाराला अनेकदा शिक्षा न होता वाढू दिले जाते, विशेषतः उच्चपदस्थ व्यक्तींमध्ये, ज्यामुळे आर्थिक अशांतता निर्माण होते आणि जनतेचा विश्वास कमी होतो.

खंडपीठाने निकालात म्हटले आहे की, भ्रष्टाचाराबद्दल सामान्यतः जे मानले जाते त्याचा एक अंशही खरा असेल, तर उच्च पदांवर असलेल्या लोकांकडून होणाऱ्या व्यापक भ्रष्टाचारामुळे या देशात आर्थिक अशांतता निर्माण झाली आहे हे सत्यापासून दूर राहणार नाही. ऐतिहासिक

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड एमआयडीसीबाबत आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली मंत्री ना. उदय सामंतांची भेट

**बीड । प्रतिनिधी**



बीडच्या एमआयडीचा विकास व्हावा याकरिता गेल्या अनेक दिवसांपासून आ.संदीप क्षीरसागर शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. त्यातच गुरूवारी (दि.६) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधीमंडळात महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेतली.

बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास व्हावा याकरिता बीड शहरात स्थित असलेल्या औद्योगिक वसाहतीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून त्याठिकाणी मोठमोठे उद्योग येतील आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल तसेच आर्थिक स्थिती सुधारेल. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून बीडच्या एमआयडीसीच्या विकासासाठी पाठपुरावा करत आहेत. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी काही दिवसांपूर्वीच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली होती. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, प्रादेशिक अधिकारी आदी वरिष्ठ अधिकार्यांसमवेतही बैठका घेतल्या होत्या. आता पुन्हा यासंदर्भात, मुंबई येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात

▶▶ उर्वरित पान २ वर

# माजी आमदार धोंडेंनी 'टायमिंग' साधलं; सुरेश धसांच्या 'खोक्या'च्या बेकायदेशीर सावकारकीची केली 'पोलखोल'

**बीड । प्रतिनिधी**



बीडमधील संतोष देशमुख हत्येतील संशयित आरोपी वाल्मिक कराड याच्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे बीडमधील नेते धनंजय मुंडे यांना घेरणारे, भाजप आमदार सुरेश धस यांच्या अडचणी त्यांचा निकटवर्तीय सतीश भोसले ऊर्फ 'खोक्या' याच्या कारनाम्यामुळे वाढल्या आहेत.

माजी आमदार भीमराव धोंडे यांनी 'टायमिंग' साधत सतीश भोसले याच्या करारनाम्याची जंत्रीच मांडली आहे. सतीश भोसलेची दहशत सांगताना, टोळी येऊन मारहाण करणे, दहशत पसरवणे, अपहरण, सावकारकी, पैशाच्या व्यवहारातून वेठीस धरणे, असे सर्व प्रकार धोंडे यांनी सांगून आमदार धस यांच्या अडचणी वाढवल्या आहेत. माजी आमदार भीमराव धोंडे यांनी शिरूरच्या बावी इथं येत ढाकणे पिता-पुत्रांची भेट घेतली. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना, सतीश भोसले ऊर्फ 'खोक्याची आणि त्याच्या गँगच्या असलेल्या दहशतीवर प्रतिक्रिया दिली. यावेळी सतीश भोसले याच्या बेकायदेशीर सावकारकीवरून घडलेल्या घटनांचा क्रम सांगितला.

भीमराव धोंडे म्हणाले, कातकडे कुटुंबाने सतीश ऊर्फ खोक्याकडून ५० हजार रुपये घेतले होते. त्या बदल्यात तो पाच लाख रुपये मागतो आहे. ज्या मुलाला पैसे दिले, तो मुलगा बेपत्ता आहे. पण त्याला सतीश भोसले याने पैशासाठी पकडून ठेवले आहे. या प्रकारबाबत कातकडे कुटुंबियांनी शिरूर पोलिसांकडे तक्रार केली आहे. पण त्याची दखल घेतलेली नाही. मोठ्या प्रमाणात सावकारकी चालते. पीडितांनी आता पुढे येऊन पोलिसांकडे तक्रारी केल्या पाहिजेत. पोलिसांनी पीडितांना सहकार्य करावे. पोलिसांनी याची दखल न घेतल्या मोठं आंदोलन करून, असा इशारा दिला आहे.

सुरेश धसाचा कार्यकर्ता असला, तरी त्यांनी असे काही प्रकार करायला सांगितले नसेल. पण सुरेश धसांचे अनेक कार्यकर्ते, असे प्रकार करतात.

▶▶ उर्वरित पान २ वर

# महाजनवाडी गावातील शेतकऱ्यांचे सोयाबीन आणि कडबा शार्क सर्किटने जळाले अंदाजे लाखांचे नुकसान

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील मौजे महाजनवाडी येथे आज दि.७ सोमवार रोजी दुपारी २ वाजता शार्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीमुळे येथील गट नंबर २१७ मधील शेतकरी बाबासाहेब लक्ष्मण घरत यांचे १५ क्विंटल सोयाबीन आणि २०० ज्वारीचा कडबा असे एकुण ६५ हजार रूपयांचे नुकसान झाले तर लगतच्या गट नंबर २१६ मधील शेतकरी राणुबाई रामचंद्र शिंदे यांच्या शेतातील सोयाबीन १० क्विंटल अंदाजे किंमत ४० हजार रुपये शार्ट सर्किटमुळे जळाले. महावितरणच्या गलधान कारभारामुळे हि आग लागुन नुकसान झाल्याने आम्हाला नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी फोनवरून तहसीलदार चंद्रकांत शेळके,महावितरणचे अभियंता अभिजित शिंदे आणि नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी चंद्रकांत गोसावी यांना फोन वरून कल्पना दिली असुन पंचनामा करण्यासाठी कर्मचारी पाठवतो म्हणाले. नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांनी घटनास्थळी भेट देऊन स्थळ पंचनामा केला.

# सद्भावना यात्रेस बहुसंख्येने उपस्थित रहा : सिद्धेश्वर रणदिवे



भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेशअध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील,आदित्य पाटील जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथून ही पदयात्रा सुरू केली जाणार आहे. भगवानगड व नारायणगड या महत्त्वाच्या प्रेरणास्थानी वंदन करून सामाजिक सद्भावनेसाठी साकडे घातले जाणार आहे. त्यानंतर ८ मार्च रोजी सकाळी मस्साजोग येथून ही पदयात्रा सुरू होईल. तिथून नांदूरफाटा, येळंब, नेकनूर, मंजरसुंबा, पाली या मार्गावरून ५१ किलोमीटर प्रवास करून यात्रा बीड शहरात पोहोचेल व बीड शहरात नाट्यगृह येथे सद्भावना सभेने या यात्रेचा समारोप होणार आहे. आठ आणि नऊ मार्च रोजी सद्भावना पदयात्रा संपन्न होणार असुन या यात्रेत जिल्ह्यातील विविध जाती आणि धर्मातील बंधू-भगिनींना सहभागी होण्याचे आव्हान केले आहे. काँग्रेस तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर रणदिवे सर यांनी या पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. सद्भावना यात्रा ही बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोखा आणि बंधुभाव पुनरस्थापित करण्यासाठी आहे. हा फक्त राजकीय नाही तर एक सामाजिक उपक्रम आहे. ज्याची सध्या बीड जिल्ह्याला अत्यंत आवश्यकता आहे. सध्या दूषित झालेले सामाजिक वातावरण बदलण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक, तरुण, महिला, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यकार, पत्रकार, सामाजिक संघटनेचे प्रतिनिधी व युवक काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी यांनी मोठ्या संख्येने पदयात्रेत सहभागी व्हावे अशे आव्हान काँग्रेस धारुर तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर रणदिवे सर यांनी या पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# आदित्य एज्युकेशन ग्रुपला बीडमध्ये मानाचं पान

## आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयाला व्हर्च्युअल लर्निंग आणि नूडल्स सेंटर कार्यशाळेला मिळाली मान्यता

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्था ही बीड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील एक नावाजलेलं नाव आहे. संस्थेने शिक्षणाचा दर्जा कायम राखत प्रगती केली आहे. आज आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी देशात आणि देशाबाहेरील नामवंत संस्थेत मोठ-मोठ्या पदावर कार्यरत आहेत. आदित्य शिक्षण संस्थेला पुन्हा एकदा बीड जिल्ह्यात मानाचे पान मिळाले असून आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयाला व्हर्च्युअल लर्निंग आणि नूडल्स सेंटर कार्यशाळेला मिळाली मान्यता मिळाल्याने आता बीड जिल्ह्यातील इतर महाविद्यालयातील विद्यार्थी येथे येवून प्रात्यक्षिक, तांत्रिक नॉलेज प्रगत करता येणार आहे.

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध उपक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमाचा एक भाग म्हणून आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयास शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (यांत्रिकी विद्यापीठ),पुणे आणि



आय आय टी खरगपूर यांच्या संयुक्त विद्यमाने (वर्चुअल लर्निंग आणि नूडल्स सेंटर कार्यशाळा)

▶▶ उर्वरित पान २ वर

### बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक फायदा होणार

**आदित्य शिक्षण संस्थेतील प्रत्येक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. आदित्य शिक्षण संस्था शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असल्याने आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयाला व्हर्च्युअल लर्निंग आणि नूडल्स सेंटर कार्यशाळेला शासनाची मान्यता मिळाली आहे. या कार्यशाळेचा आदित्य शिक्षण संस्थेसह जिल्ह्यातील इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना डव्हान्स नेटवर्किंग, व्हर्च्युअल लर्निंग टूल्स आणि कटिंग एज टेक्नॉलॉजी बद्दलची ऍडव्हान्स माहिती या लॅब द्वारे मिळणार आहे. विद्यार्थ्यांना येथे येवून प्रात्यक्षिक करता येणार आहे. त्यांच्या तांत्रिक नॉलेजमध्ये मोठी भर पडणार आहे. -डॉ. आदित्य सारडा, संचालक आदित्य शिक्षण संस्था. बीड.**




CMYK

# जागतिक महिला दिन : एक उत्सव , एक संघर्ष !

## आई , वहीण , पत्नी , लेकीस महिला दिनाच्या शुभेच्छा !



**जागतिक महिला दिन , जो ८ मार्च रोजी साजरा केला जातो , हा दिवस महिलांच्या कष्टाची , बलिदानाची , संघर्षाची आणि त्यांच्या अभूतपूर्व यशाची ओळख म्हणून महत्त्वाचा ठरतो . या दिवशी , संपूर्ण जगभर महिलांचे योगदान आणि त्यांच्या समोर असलेल्या विविध आव्हानांची दखल घेतली जाते . महिला केवळ घरातील कामकाजासाठीच नाही , तर समाज , शिक्षण , विज्ञान , कला , तंत्रज्ञान , उद्योग आणि विविध इतर क्षेत्रांत देखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.**

वर्षानुवर्षे महिलांना त्यांच्या हक्कांसाठी लढावे लागले . त्यांनी समाजातील प्रचलित रूढी , भेदभाव आणि अत्याचारांविरुद्ध आवाज उठवला . महिलांच्या हक्कांसाठी लढलेल्या इतिहासाच्या पिढ्यांपासून ते आजपर्यंत विविध सामाजिक , राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण बदल घडवले गेले आहेत. या दिवशी , आपण महिलांच्या संघर्षाला मान देत , त्यांना अधिक सन्मान आणि न्यायपूर्ण अधिकार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करायला हवे . महिलांना शिक्षणाच्या क्षेत्रात , व्यवसायात आणि समाजाच्या विविध अंगांत अधिक संधी मिळाव्यात यासाठी सरकार आणि नागरिक दोघांनीही एकत्र येऊन कार्य केले पाहिज. महिला दिन केवळ एक उत्सव नाही , तर तो एक गंभीर जागरूकतेचा दिवस आहे . महिलांच्या योगदानाला सलाम देताना , आपण त्यांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सामाजिक , आर्थिक , मानसिक आणि शारीरिक आरोग्याच्या संदर्भातील समस्यांवर विचार करणे आवश्यक आहे . प्रत्येक महिला , तिच्या कामामुळे आणि कष्टामुळे , समाजाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देत असते. सर्वात महत्वाचे म्हणजे , जागतिक महिला दिन हा एक संकल्प दिवस असावा . हा दिवस महिलांच्या समानतेसाठी , त्यांच्या सशक्तीकरणासाठी आणि सर्व स्तरांवरील महिलांच्या हक्कांसाठी जागरूकता वाढवण्याची एक संधी असावी . यामुळे महिलांचा आवाज आणखी दृढ होईल , आणि समाजात त्यांना सन्मानाने आणि समानतेने वावरता येईल .

महिलांच्या संघर्षाची कहाणी : - महिलांनी गेल्या शंभर वर्षांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये मोठे कार्य केले आहे . राजकारण , विज्ञान , कला , साहित्य , क्रीडा आणि अनेक अन्य क्षेत्रांमध्ये त्यांनी आपला ठसा निर्माण केला आहे . भारतीय महिलांची उदाहरणे घेतली तरी , इंदिरा गांधी , सरोजिनी नायडू , मीराबाई चानू , कल्पना चावला यांसारख्या दिग्गज महिलांनी आपल्या कष्ट आणि संघर्षाने इतिहास रचला आहे .

समाजाच्या बदलत्या गरजा : - आजकाल महिला शिक्षण , रोजगार , आरोग्य , समजातील हिंसा विरुद्ध लढा अशा अनेक बाबींमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत . ' महिला सक्षम झाली तर समाज सक्षम होतो ' हा संदेश आता एक आदर्श बनला आहे . महिलांच्या मागणीसाठी तसेच त्यांच्या हक्कांसाठी होणारे संघर्ष समाजाच्या प्रगतीत महत्वाची भूमिका बजावतात .

महिला दिन साजरा करणे : - जागतिक महिला दिन साजरा करताना आपल्याला महिलांच्या कार्याची कदर करण्याबरोबरच , त्यांच्या समतुल्य संधीची आवश्यकता देखील लक्षात ठेवावी लागेल . हा दिवस महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने एक प्रेरणा देणारा असावा ,




ज्यामुळे महिलांना त्यांच्या स्वप्नांनुसार जगण्याची संधी मिळेल . महिलांना समानता आणि सन्मान मिळाल्यास , समाजाचा प्रगतीचा मार्ग अधिक सुकर होईल .

महिला दिनाचा इतिहास : जागतिक महिला दिनाच्या सुरुवातीची गोष्ट ८ मार्च १९०८ ला न्यूयॉर्क शहरात घडली . त्यावेळी १५ हजार महिला कामाच्या ठिकाणी सुधारणा , मतदान हक्क आणि चांगल्या काम काजी परिस्थितीच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरल्या . त्यांना विरोध करण्यात आला , पण त्यानंतर या आंदोलकांच्या आवाजाचा प्रभाव वाढला .

दुसऱ्या महिला काँग्रेसमध्ये जर्मनीतील क्लारा झेटकिन यांच्या नेतृत्वाखाली एका जागतिक महिला दिनाच्या स्थापनेसाठी ठराव मांडला गेला . त्याच वर्षी , १९११ मध्ये पहिला जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला होता , जरी तो विविध देशांमध्ये विविध तारखांना साजरा केला गेला . १९७७ साली संयुक्त राष्ट्रसंघाने ८ मार्चला जागतिक महिला दिन म्हणून घोषित केले , आणि त्यानंतर हा दिवस जागतिक स्तरावर साजरा केला जायला लागला .

महिला दिन कसा साजरा होतो :- आजच्या काळात ८ मार्च हा दिवस महिलांच्या प्रेरणादायक कार्यांचे आणि त्यांच्या सशक्ततेचे प्रतीक बनला आहे . जगभरातील प्रत्येक देशात विविध कार्यक्रम , चर्चासत्रे , उपक्रम आणि रॅली यांचे आयोजन केले जाते . काही ठिकाणी महिलांना सन्मानित करून , त्यांचे कार्य गौरवले जाते . शिक्षण , विज्ञान , क्रीडा , कला , राजकारण अशा विविध क्षेत्रांमध्ये महिलांची विशेष कामगिरी दाखवली जाते . तसच , हा दिवस महिलांच्या अधिकारांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी सुद्धा महत्वाचा ठरतो . महिलांवरील हिंसा , लैंगिक शोषण , समान वेतन इत्यादी मुद्द्यांवर अधिक चर्चा केली जात. संपूर्ण अमेरिका आणि युरोपसहित जवळजवळ संपूर्ण जगभरातील स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता . या अन्यायाविरुद्ध स्त्रिया आपापल्या परीने संघर्ष करीत होत्या . १८९० मध्ये अमेरिकेत मतदानाच्या हक्कासंदर्भात ऋद नॅशनल अमेरिकन सफ्रेजिस्ट असोसिएशन ' स्थापन झाली .

१९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत , ८ मार्च १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री-कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ , ८ मार्च हा 'जागतिक महिला-दिन ' म्हणून स्वीकारावा असा जो ठराव क्लाराने मांडला , तो पास झाला .

काळाच्या ओघात केवळ ' चूल आणि मूल ' एवढीच मर्यादित कामे न करता स्त्रियांनी या चाकोरीतून मुक्त झाले पाहिजे असा उदारमतवादी विचार समाजाने स्वीकारला असला तरी देखील लौकिक अर्थाने स्त्रियांवरच्या जबाबदाऱ्या आणि सामाजिक बंधने अजून तशीच आहेत. या वर्षी हा दिवस ' ॲक्सलरेट ॲक्शन ' या थीमखाली साजरा केला जाईल . २०२५ ची ही थीम तरुण महिला आणि मुलींना बदलाचे प्रतिनिधी म्हणून सक्षम करण्यावर आणि हवामान न्याय आणि डिजिटल समावेश यासारख्या नवीन आव्हानांना प्रतिसाद देण्यावर भर देण्यात आलेली आहे. वानगीदाखल दिली जाणारी गार्गी , मैत्रेयी , लोपामुद्रा आणि उभयभारती अशी काही उदाहरणे वगळता प्राचीन काळात देखील स्त्रियांच्या चरित्र गौरवाची फारशी उदाहरणे आपल्याला आढळत नाहीत . भारतीय समाज आणि भारतीय संस्कृती आणि त्यातील व्यवस्थेचा डोलारा सांभाळणारी व त्यासाठी सतत कार्यरत असणारी स्त्री ही हिंदू स्त्रीची साधारण प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभी राहते .

ग्रामीण महिला आणि स्वातंत्र्य :- ग्रामीण स्त्रियांना संधी आणि स्वातंत्र्याचा अभाव , मर्यादित संसाधने यांचा सामना करावा लागतो . याशिवाय चालीरीतींच्या ओझ्याखाली ग्रामीण जीवनाचा गाडा ओढत त्यांना संसार करावा लागतो . ग्रामीण भागात स्त्रियांचे मनुष्यबळातील प्रमाण केवळ २१ टक्के एवढेच आहे . आणि या वास्तवाला अनेक घटक कारणीभूत ठरतात . परिणामी अर्ध्याहून अधिक स्त्रिया या मुख्य प्रवाहात न समाविष्ट होता दुर्लक्षित राहतात . परिणामी आपल्या देशाची उत्पादक शक्ती वाया जाते आणि अपिरिमित हानी होते .

बदलाच्या शोधातली ग्रामीण स्त्री :- ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्न आज सुटले आहेत असे नाही , पण पूर्वीपेक्षा परिस्थितीत किती तरी बदल होत आहेत . ताठ मानेन जगू पाहणाऱ्या या स्त्रीला आधार देण आणि शहर व गावातील स्त्री जीवनातील दरी कमी करणं ही आज काळाची गरज आहे .

महिला चळवळीच्या कार्याचा आढावा घेताना एक गोष्ट जाणवते की , जे काही संघर्ष आणि लढे झाले ते प्रामुख्याने शहरी स्त्रियांच्या प्रश्नांशी निगडित होते आणि कार्यकर्त्या प्रामुख्याने शहरी भागात राहणाऱ्या मध्यमवर्गीय पांढरपेशा स्त्रिया होत्या . परित्यक्तांचे प्रश्न , हुंडाबळी , कुटुंबातील अत्याचार हे प्रश्न शहर आणि ग्रामीण भागात सारखेच जटिल आहेत . पण त्याही पुढे जाऊन ग्रामीण स्त्रीचे काही जीवनावश्यक प्रश्न आहेत . त्याचा अधूनमधून काही महिला चळवळींनी विचार केला तरी थेट गाभ्यालाच भिडण्याचे कार्य झाले नाही आणि शहरी चळवळींशी ग्रामीण स्त्रियांच्या प्रश्नांचा सांधा फारसा जुळला गेला नाही . शहरी स्त्रियांपेक्षा ग्रामीण स्त्रीच आयुष्य अधिक शारीरिक कष्टाचं आहे . घरकाम , स्वच्छता , स्वयंपाक ही तर नेहमीची कामे आहेतच . पाणी भरणे हे तर प्रामुख्याने बाईचे काम . उन्हाळ्याच्या दिवसात खोल गेलेल्या विहिरीच्या कडेकपाऱ्यांवर उभ्या राहिलेल्या मुली , तरुण स्त्रिया , वृद्धा जेव्हा पाणी भरण्यासाठी हंडे , कळशा घेऊन चार-पाच मैलांची पायपीट पाण्यासाठी करताना वृत्तपत्रांतील फोटोत दिसतात , तेव्हा आपल्यालाच घरातला नळ सोडल्यावर हवे तितके पाणी वापरण्याच्या आपल्या वृत्तीची लाज वाटते . कष्ट आणि वेळ दोन्ही इतक्या मोठय़ा प्रमाणात खर्च होऊनही राग आणि कडवटपणाचा भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नाही . स्वत:ची शेती असेल तर शेतकरी स्त्रीला शेतावरची कष्टाची कामे नेहमीच करावी लागतात . शिवाय कुक्कुटपालन , दूधदुभत्याची व्यवस्था ही कामे बहुधा बायकांची असतात . शेतमजूर म्हणून दुसऱ्यांच्या शेतावर राबणाऱ्या स्त्रियांनाही पुरुषांपेक्षा कमी मजुरी मिळते आणि आर्थिक शोषणालाही तोंड द्यावे लागते . गरीब घरातून मुलीचे शिक्षणही लवकरच थांबते आणि अल्पवयात बाळंतपणे , कुपोषण , अनारोग्य यांच्याशी त्यांना सामना करायला लावणे याही गोष्टी सर्वसामान्य आहेत . काळाच्या ओघात ही परिस्थिती बदलण्याचे अनेक प्रयत्न झाले . त्यात ग्रामीण स्त्रियांचाही सिंहाचा वाटा आहे . यातल्या काही प्रयत्नांचा मागोवा घेतला तर होणारे आशादायक बदल दिसून येतील .

ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्न आज सुटले आहेत असे नाही , पण पूर्वीपेक्षा परिस्थितीत किती तरी बदल होत आहेत . शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या तुलनेत शेतकरी स्त्रियांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी आहे . त्यामागच्या अनेक कारणांत परिस्थितीशी चिवटपणे झुंजण्याचे स्त्रीचे सामर्थ्य आहे . गरिबातल्या गरीब घरातील मुलीही आज शिक्षणासाठी घरापासून दूर राहून शिक्षण घेण्याच्या खटपटीत दिसतात . अल्पवयातील लग्नाचे प्रमाणही तुलनेने कमी झाले आहे .ताठ मानेनं जगू पाहणाऱ्या या स्त्रीला आधार देणं आणि शहर व गावातील स्त्री जीवनातील दरी कमी करण ही आज काळाची गरज आहे .

महिला दिनानिमित्त भारतातील या प्रभावी महिलांचा परिचय असलाच पाहिजे :

राजमाता जिजाबाई शहाजी भोसले : - ह्या मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई होत्या . त्यांना राजमाता , राष्ट्रमाता , जिजाबाई किंवा जिजाऊ म्हणून संबोधले जाते . राणी लक्ष्मीबाई : शौर्य , देशभक्ती आणि राष्ट्रवादाचे प्रतीक . राणी लक्ष्मीबाईंच्या अटल वचनबद्धतेमुळे त्या भारतीय इतिहासात प्रेरणा आणि शक्तीचे प्रतीक बनल्या आहेत .

सावित्रीबाई फुले : या भारतातील एक अग्रणी समाजसुधारक होत्या , विशेषतः १९ व्या शतकात महिला शिक्षणात त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेसाठी ओळखल्या जातात . १८४८ मध्ये त्यांनी आणि त्यांचे पती , ज्योतिराव फुले यांनी पुण्यातील पहिली मुलींची शाळा स्थापन करून सामाजिक परंपरा मोडल्या . सावित्रीबाईंनी महिलांसाठी शिक्षणाचा प्रचार करण्यासाठी , त्यांच्या हक्कांसाठी वकिली करण्यासाठी आणि भेदभावाला आव्हान देण्यासाठी आपले जीवन समर्पित केले .

विजयालक्ष्मी पंडीत : त्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेच्या पहिल्या भारतीय आणि जगातील पहिल्या महिला अध्यक्ष होत्या .

अहिल्याबाई होळकर : यांचा जन्म चोंडी येथे झाला . त्या १८ व्या शतकातील मालव्यातील प्रमुख राणी होत्या . त्या त्यांच्या सर्जनशील शासन आणि सार्वजनिक कल्याणासाठी समर्पणासाठी प्रसिद्ध होत्या .

सरोजिनी नायडू : भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रमुख व्यक्तिमत्व , त्यांनी स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली . १९२५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा होणाऱ्या पहिल्या भारतीय महिला म्हणून , त्यांनी निर्भयपणे राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी पुढाकार घेतला .

किरण बेदी : भारतीय पोलिस सेवेतील एक अग्रणी म्हणून जन्मलेल्या किरण बेदी यांनी अधिकारी पदावर रुजू होणाऱ्या पहिल्या महिला म्हणून इतिहास रचला . पोलिस सेवेतील सुधारणांमध्ये अग्रेसर आणि तुरुंग सुधारणांमध्ये प्रभावी बदल घडवून आणणे हे त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचे वैशिष्ट्य आहे . बेदी यांच्या नियुक्तीमुळे पोलिसिंगमध्ये एक परिवर्तन घडले , कार्यक्षमता आणि जबाबदारी वाढली .

बेगम हजरत महल : - अवधचे शासक नवाब वाजिद अली शाह यांच्या पत्नी बेगम यांनी ब्रिटीशांकडून कोणतेही उपकार किंवा भत्ते स्वीकारण्यास नकार दिला . बेगम यांनी त्यांचा सेनापती राजा जैलाल सिंग यांच्या मदतीने ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीशी शौर्याने लढा दिला .

मदर तेरेसा : यांचा वारसा त्यांच्या आयुष्याच्या पलीकडे पसरला आहे , त्यांच्या अथक सेवेमुळे त्यांना १९७९ मध्ये नोबेल शांतता पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले . मिशनरीज ऑफ चॅरिटीद्वारे त्यांचे ध्येय व सेवा चालते. जागतिक महिला दिन हा केवळ महिलांचा सन्मान करण्याचा दिवस नाही , तर त्यांना समाजात समान अधिकार मिळवून देण्याचा दिवस आहे . या दिवसाच्या माध्यमातून आपण महिलांच्या कार्याची कदर करायला हवी आणि त्या क्षेत्रात अधिक प्रगती साधण्यासाठी त्यांना योग्य संधी देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत . एकत्र येऊन , प्रत्येक व्यक्तीला समान हक्क देणारा समाज निर्माण करणे हेच महिला दिनाचे खरे महत्व आहे .

उंबरा ओलांडून घराला
मंदिर बनवणारी लक्ष्मी आहे ती
संसाराचा गाडा चालवणारी
देव्हाऱ्यातील माऊली आहे ती
अशी माऊली तुझ्याविणा व्यर्थ सारं काही
महिला दिनाच्या शुभेच्छा !

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके ,**
**तहसीलदार, बीड**

पान 1 वरून पुढे...

## 'भ्रष्ट राजकारणी...

समांतरता दर्शवत, सर्वोच्च न्यायालयाने ब्रिटिश राजकारणी एडमंड बर्क यांचे शब्द उद्धृत केले, सामान्यतः भ्रष्ट लोकांमध्ये स्वातंत्र्य जास्त काळ टिकू शकत नाही, आणि भ्रष्टाचाराचे चांगले दस्तऐवजीकरण झालेले परिणाम असूनही तो कायम आहे याबद्दल खेद व्यक्त केला.

बन्सल यांची याचिका फेटाळून लावताना, सर्वोच्च न्यायालयाने भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये अटकपूर्व जामीन मंजूर करण्यासाठी कठोर निकष ठेवले आणि असा निर्णय दिला की जर न्यायालयाला प्रथमदर्शनी असे आढळून आले की अर्जदाराला गुन्ह्यात चुकीच्या पद्धतीने गोवण्यात आले आहे किंवा आरोप राजकीयदृष्ट्या प्रेरित किंवा क्षुल्लक आहेत तरच अपवादात्मक परिस्थितीत जामीन मंजूर केला पाहिजे. बन्सल यांचा खटला या निकषांची पूर्तता करत नाही, असे स्पष्ट करून जामीन नाकारण्याचे समर्थन केले.

भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत खटला चालवण्यासाठी लाचेची प्रत्यक्ष देवाणघेवाण आवश्यक नाही, असे खंडपीठाने पुढे स्पष्ट केले. या निकालात असे म्हटले आहे की जे सरकारी कर्मचारी थेट लाच घेत नाहीत तर मध्यस्थ किंवा दलालांमार्फत लाच घेतात आणि ज्यांच्याशी त्यांचे अधिकृत व्यवहार आहेत किंवा असण्याची शक्यता आहे अशा व्यक्तींकडून मौल्यवान वस्तू स्वीकारतात ते देखील दंडनीय आहेत. तक्रारदाराच्या पत्नीच्या सरपंचपदाच्या कार्यकाळात सुरू झालेल्या विकास प्रकल्पांचे ऑडिट करण्यासाठी बेकायदेशीर लाच मागितल्याचा आरोप ऑडिट इन्स्पेक्टर बन्सल यांच्यावर आहे. सरकारी वकिलांच्या म्हणण्यानुसार, सह-आरोपी पृथ्वी सिंगने बन्सलच्या वतीने लाच घेतल्याचा आरोप आहे.

## बीड एमआयडीसीबाबत...

आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेतली आहे. दरम्यान याविषयी ना.सामंत यांनी सकारात्मक

पान 1 वरून पुढे...

प्रतिसाद देत लवकरच सविस्तर बैठक लावण्याचे सांगितले आहे.

## माजी आमदार धोंडेंनी...

बऱ्याच गावात दडपशाही आहे. धस यांच्या आष्टीमध्ये बंडू धोंडे नावाच्या व्यक्तीचे दीड लाखांचे ७० लाख झाले आहे. बंडू धोंडे यांनी स्वतः पोलिस अधीक्षकांकडे तक्रार दिली आहे. पण कारवाईच झालेली नाही. पोलिसांनी सतीश भोसले आणि त्याच्या गँगवर आता मकोका लावला पाहिजे, अशी मागणी भीमराव धोंडे यांनी केली. मुख्यमंत्र्यांची भेट घेणार

आष्टी, पाटोद्यामधील बेकायदेशीर सावकारकीला बळी पडलेल्यांची यादी माझ्याकडे आहे. शिरूरमधील लोकांनी त्यांची यादी मला द्यावी. मी मुख्यमंत्र्यांना लवकरच याबाबत भेटणार आहे. यासाठी एक शिष्टमंडळ तयार करून भेटणार असल्याचे भीमराव धोंडे यांनी सांगितले.

## आदित्य एज्युकेशन...

मान्यता मिळाली असुन समंजस करार झालेला आहे. या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांना डव्हान्स नेटवर्किंग, व्हर्च्युअल लर्निंग टूल्स आणि कटिंग एज टेक्नॉलॉजी बद्दलची ॲडव्हान्स माहिती या लॅब द्वारे विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक तांत्रिक नॉलेज प्रगत करण्यासाठी मदत होणार आहे.

या कार्यशाळेचे शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील नॉलेज यामधील दुवा भरून निघणार आहे. ही कार्यशाळेची परवानगी मिळण्यासाठी आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर पंकज कदू यांनी संस्थेचे

मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न केले. इतर महाविद्यालयाचे विभाग प्रमुख आणि प्राध्यापक यांनी परिश्रम घेतले.


## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती डी.के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३७६/२०२५, धरमसिंग विरुध्द निरंक**

अर्जदार :- १) धरमसिंग पि. नारायणसिंग ठाकूर, वय ६४ वर्षे धंदा शेती, रा. कटकटपुरा, जुनी भाजीमंडई, अशोक टॉकीज जवळ, बीड ता. जि. बीड २) सुरज पि.धरमसिंग ठाकूर वय ३५ वर्षे धंदा व्यवसाय रा. सदर

विरुध्द निरंक

मागणी अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे **शोभाबाई . धरमसिंग ठाकूर** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे **शोभाबाई भ्र. धरमसिंग ठाकूर** रा. कटकटपुरा, जुनी भाजीमंडई, अशोक टॉकीज जवळ, बीड ता जि.बीड यांचा मृत्यु दिनांक : १९.११.२०२४ रोजी सूर्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल क्रिटीकल केअर यूनिट, बीड ता.जि.बीड येथे झाला. अर्जदार क १ हे मयताचे पती आहेत. अर्जदार क २ हा मयताचा मुलगा आहे. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत **शोभाबाई भ्र. धरमसिंग ठाकूर** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/०३/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक २२/०४/२०२५.

**(ॲड. खाडे एस.डी. यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक** शिक्का **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, बीड**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती पी डी चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ४०५/२०२५, गणपती पि. देविदास म्हेत्रे व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. गणपती पि. देविदास म्हेत्रे, वय - ५४ वर्षे, धंदा - शेती, रा. नाळवंडी, ता. जि. बीड, २. अभिमान पि. देविदास म्हेत्रे, वय - ५२, वर्षे, धंदा - शेती, रा. नाळवंडी, ता. जि. बीड, ३. बंडु पि. देविदास म्हेत्रे, वय - ४२, वर्षे, धंदा-शेती, रा. नाळवंडी, ता. जि. बीड, ४. कांताबाई भ्र. आसाराम म्हेत्रे, वय - ६४ वर्षे, धंदा - घरकाम, रा. नाळवंडी, ता. जि. बीड, ५. भागवत पि. आसाराम म्हेत्रे, वय - ३३, वर्षे, धंदा - शेती, रा. नाळवंडी, ता. जि. बीड, ६. शांताबाई भ्र. केरबा ढगे, वय - ६१, वर्षे, धंदा - घरकाम, रा. सुलतानपुर ता. माजलगाव, जि. बीड, ७. संगिता भ्र. महादेव शिंदे वय - ५३, वर्षे, धंदा - घरकाम, रा. पिंपरखेड ता. वडवणी, जि. बीड, ८. संजीवणी भ्र. महादेव जंगले, वय - ४८, वर्षे, धंदा - घरकाम, रा. त्रिमुर्ती कॉलनी, पात्रुड, ता. माजलगाव, जि. बीड ९. सुनिता भ्र. गोरखनाथ काळे, वय - ४५, वर्षे, धंदा - घरकाम, रा.स्वप्नपुर्ती हाउसिंग सोसा. स्पाइन रोड, चिखली, पुणे ४११ ०६२ (अर्जदार हे भारतीय आहेत )

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **देविदास गणपती म्हेत्रे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत **देविदास गणपती म्हेत्रे** यांचा मृत्यु दिनांक २५.०६.२०१८ मौजे नाळवंडी ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क १ ते ३ हे मयताचे मुले असून अर्जदार क ४ ही मयताची सुन म्हणजे मयत मुलगा आसाराम देविदास म्हेत्रे याची पत्नी आहे तर अर्जदार क ५ हा मयताचा नातु म्हणजे अर्जदार क ४ चा मुलगा आहे. अर्जदार क ६ ते ९ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत मयत देविदास गणपती म्हेत्रे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६ मार्च २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५ एप्रिल २०२५

**(ॲड. एम डी धांडे यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक** शिक्का **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, बीड**


Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शेतकऱ्यांना चारा लागवडीसाठी हजार हेक्टर जमिनीस प्रशासकीय मान्यता द्यावी

## वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांच्या सूचना

**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी स्वावलंबन योजनेअंतर्गत जिल्ह्यात गायरान जमिनीवर जाळा लागवडीसाठी हजार हेक्टर वर आहे याला प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशा सूचना स्वर्गीय वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड.निलेश हेलोंडे पाटील यांनी एका बैठकीत दिल्या.



आपल्या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यात या बैठकीत बीड तालुक्यातील पिंपळवाडी मधील मयत शेतकरी दादाराव बहिरवाळ यांच्या वारसांना त्यांनी यावेळी भेट दिली. सर्व शेतकऱ्यांना मदत व्हावी या दृष्टिकोनातून प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या कंपनी व प्रतिनिधीचे नाव आणि मोबाईल प्रत्येक ग्रामपंचायतीत फ्लेक्स द्वारे लावावा अशी सूचना त्यांनी या बैठकीत केली. विदर्भ व मराठवाडा विभागातील शेतक-यांच्या आत्महत्या प्रकरणांची दखल घेऊन त्यावर तातडीची उपाययोजना करण्यासाठी व शेतक-यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची शासनाने नियुक्ती केलेली आहे. या अनुषंगाने कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड निलेश हेलोंडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मिशनसंबंधी जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे संपन्न झाली. या बैठकीस जिल्हाधिकारी अविनाश पाठक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, जिल्हा कृषी अधिकारी विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी विशेष रोजगार मेळावा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना स्थानिक ठिकाणी रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बीड मार्फत दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी स्वा.सावरकर महाविद्यालय सावरकर नगर नेत्रधाम हॉस्पीटल शेजारी, जालना रोड बीड येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदर मेळाव्यामध्ये पुढिलप्रमाणे नांमाकित कंपनीच्या वतीने बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी याकरिता मुलाखती घेण्यात येणार आहेत. गुरुकुल इंगलिश स्कुल बीड, येथे प्राथमिक शिक्षक एकूण पदे-२० शैक्षणिक पात्रता- डी.एड./बी.एड (इंग्रजी) वयोमर्यादा-२५ ते ३५ जॉब लोकेशन- बीड.एल. आय. सी बीड, विमा सखी एकूण पदे ५० शैक्षणिक पात्रता- १० वी किंवा १२ वी वयोमर्यादा-१८ ते ४५ जॉब लोकेशन-बीड जिनिअस इंगलिश स्कुल, बीड येथे व्हाईस प्रिनसिपल एकुण पदे ०१ शैक्षणिक पात्रता- ग्रॅज्युएट,बी.एड अनुभव ५ वर्षे अकांउट/क्लार्क एकुण पदे ०२ शैक्षणिक पात्रता-बी.कॉम/एम.कॉम/टॅली अनुभव २ वर्षे प्राथमिक शिक्षक- एकुण पदे ११ शैक्षणिक पात्रता- डी.एड./बी.एड (इंग्रजी) वयोमर्यादा-२५ ते ३५,समर्थ नर्सिंग स्कुल, बीड येथे प्राचार्य, एकुण पदे-०१ शैक्षणिक पात्रता-बी.एस.सी नर्सिंग वयोमर्यादा १८ ते ३० टयुटर, एकुण पदे-०९ शैक्षणिक पात्रता-बी.एस.सी नर्सिंग वयोमर्यादा १८ ते ३०, अकाउटंट/क्लार्क-एकुण पदे-०२ शैक्षणिक पात्रता-बी.कॉम/एम.कॉम/टॅली वयोमर्यादा १८ ते ३०,एस.जी.सॉप्टवेअर सोल्युशन, मार्केट डेव्हलपमेंट ऑफिसर, एकुण पदे-१० शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा १८ते ३० धुत ट्रान्समिशन छ.संभाजी नगर, ट्रेनी इंजिनिअर, एकुण पदे-७० शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन मेक.इंजिनिअरिंग डिप्लोमा इन इले.इंजिनिअरिंग वयोमर्यादा- १८ते २४, जॉब लोकेशन- छ संभाजीनगर, शिवशक्ती ग्रीटेक,बीड येथे सेल्स रिप्रजेन्टेटिव्ह एकुण पदे १५ शैक्षणिक पात्रता १० वी/ पदवी/ कृषी पदविका वयोमर्यादा १८ते २२ जॉब लोकेशन- बीड दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी स्वा.सावरकर महाविद्यालय, सावरकर नगर, नेत्रधाम हॉस्पीटल शेजारी जालना रोड बीड. येथे प्रत्यक्ष येऊन संधीचा लाभ घ्यावा. रोजगार मेळाव्यास येताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावी. या बाबत काही अडचणी असल्यास श्री. जयदत्त इंगोले यांना ९८२२७८१८७६ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा तसेच इशशव ड्ग्ग्ळश्रश्र या फेसबुक पेजला फॉलो व लाईक करावे असे आवाहन केले आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज भरण्यासाठी १५ मार्चपर्यंत मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

समाज कल्याण कार्यालयामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील इयत्ता ११ वी त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वस्तीगृहात प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांना घर भाडे व इतर खर्च भागविण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते सन २०२४-२५ या चालू शैक्षणिक वर्षापासून सदर योजना ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून त्यात त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी या वेब पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. योजनेचे अर्ज करण्यास १५ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची व्याप्ती तालुका स्तरापर्यंत वाढविण्यात आलेली असून विद्यार्थ्यांचे उशीर सुरू होणारे शैक्षणिक सत्र, ऑनलाईन अर्ज भरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी इत्यादी कारणामुळे विविध विद्यार्थी संघटना पालक विद्यार्थ्यांकडून सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षातील स्वाधार योजनेचे अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली होती त्यानुसार आयुक्त यांचे पत्र क्रमांक ६२२ दिनांक ४ मार्च २०२५ नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत १५ मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

# दिव्यांग लाभार्थ्यानी लकी ड्रॉ साठी उपस्थित राहण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बंधू लाभार्थ्याना सन २०२४-२५ मधील जिल्हा परिषदेचे स्व.उत्पन्न ५ टक्के दिव्यांग कल्याणार्थ राखीव निधी मधून अस्तिव्यंग प्रवर्गीय दिव्यांगाना मोफत तीन चाकी स्कूटर ( विथ डप्टरचा ) पुरवठा करण्याची राबविण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या अनुषंगाने पंचायत समिती कार्यालयामार्फत अर्जाची मागणी करण्यात आलेली होती. सदर बाबतची खालीलप्रमाणे अर्ज प्राप्त झालेले आहेत. बीड-१७४ अर्ज, परळी-६६ धारुर- ४७, अर्ज वडवणी- ५०, केज- ५५, शिरूर कासार- ८९, आष्टी-१६०, माजलगाव-१५७, गेवराई- ३७१, अंबाजोगाई- १११ आणि पाटोदा ४८ अर्ज प्राप्त झाले असून ५४ दिव्यांग लाभार्थ्यांना तीन चाकी स्कूटरचा पाठपुरवठा करायचा आहे सदर ५४ उद्दिष्ट दिव्यांग सर्वेक्षण २०२५ नुसार त्या त्या तालुक्यातील अस्थिभंग प्रवर्गाच्या संख्येच्या प्रमाणात खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे. वरील प्रमाणे १३२८ अर्ज प्राप्त झाले असून एकूण ५४ दिव्यांग बांधवाना तीन चाकी विथ डप्टरचा पुरवठा करावयाचा असून सदर ५४ उदिष्ट दिव्यांग सर्व्हेक्षण २०२५ नूसार त्या त्या तालुक्यातील अस्थिव्यंग प्रवर्गाच्या प्रमाणात खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे.बीड-९, परळी-४,धारूर-२ वडवणी-२, केज-५, शिरूर कासार- ४, आष्टी-६, माजलगाव- ४, गेवराई- ८, अंबाजोगाई-८ आणि पाटोदा-२ असे एकूण ५४ अर्ज. अर्जाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे निर्धारित उद्दिष्टनुसार पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने दि. ८ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड येथे लकी ड्रॉ चे आयोजन करण्यात आले आहे.

# आष्टी पंचायत समिती आमसभेसाठी संबधितानी उपस्थित राहावे

**बीड । प्रतिनिधी**

पंचायत समिती आष्टीची आमसभा पंचायत समितीच्या प्रांगणात दि. १५ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आमदार सुरेश रामचंद्र धस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. आम सभेकरीता आजी माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, सहकारी संस्थेचे पदाधिकार, ग्राम पंचायत अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, मुख्याध्यापक यांनी उपस्थित राहवे, असे आष्टी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# ॲग्री स्टॅक साठी शेतकऱ्यांनी नोंदणी करावी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना भेटी देऊन माहीती

### प्रभारी तहसीलदार सुरेश पाळवदे चा उपक्रम

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना सर.व कामा साठी एकत्रीत सुविधा उपलब्ध व्हावी या साठी ॲग्री स्टॅक मोहीम राबवण्यात येत असून भोपाळ देवदहीफळ मोहखेड आदी ठिकाणी जाऊन योजनेची सविस्तर माहीती प्रभारी तहसीलदार सुरेश पाळंदे यांनी देऊन या योजनेत नोंदनी करून लाभ घ्यावा असे



आवाहन प्रभारी तहसीलदार सुरेश पाळंदे यांनी शेतकऱ्यांना केले आहे. शेतकऱ्यांची सर्व गैरसोय दुर व्हावी व सर्व सुविधा त्यांना एका क्षणात मिळाव्यात त्यांचे वेळेचा अपव्यय टाळण्या साठी शासन ग्रीस्टॅकयोजना राबवत असून फार्मर आयडी व फार्म आयडी काढणे या साठी बंधन कारक केले असून सी एस सी सेंटर वर यांची नोंद केली जात आहे याचे कॅम्प मध्ये काम चालू आहे देवदहीफळ, भोपा मोहखेड आदी ठिकाणी प्रभारी तंहसीलदार सुरेश पाळंदे यांनी भेटी देऊन पहाणी केली व शेतकऱ्यांना माहीती सांगीतली . सी एस सी केंद्र मोहखेड येथे प्र तहसीलदार सुरेश पाळवदे यांनी शेतकऱ्यांना एकत्रित करून या योजनेचे शेतकऱ्यांना होणारे फायदे सांगून तात्काळ नोंदणी करण्याचे अवाहण केले. यावेळी मंडळ अधिकारी सोपान वाघमारे तलाठी भद्रे व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# सुमन धोत्रे यांचे अल्पशा आजाराने निधन ; बाळु धोत्रे यांना मातृशोक

**बीड । प्रतिनिधी**

येथील सामाजिक कार्यकर्ते बाळु धोत्रे यांच्या मातोश्री श्रीमती सुमन वशिष्ठ धोत्रे (६५ वर्षे) यांचे शुक्रवारी दि.७ मार्च २०२५ रोजी सकाळी ७.४० वा. अल्पशा आजाराने निधन झाले.



माळीवेस बेदरे मळा भागात सर्वांच्या परिचयाच्या असणार्या श्रीमती सुमन वशिष्ठ धोत्रे या अत्यंत मनमिळावू स्वभावाच्या होत्या. शुक्रवारी सकाळी ७.४० वा. त्यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मोंढा भागातील अमरधाम येथे दुपारी १ वाजता अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात बाळु धोत्रे, किशोर, लहु, अंकुश ही चार मुले, दोन मुली, सुना,जावाई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# आमदार प्रकाश दादा सोळंके यांना मंत्रीपदाची संधी द्यावी : शिनगारे, जगताप, चव्हाण

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका झाल्यानंतर बीड जिल्ह्यातून प्रकाश सोळंके यांना मंत्रिपद मिळेल आणि त्यांच्या प्रदीर्घ राजकारणाचा जिल्ह्यालाच नव्हे तर राज्याला फायदा होईल ही अपेक्षा होती. परंतु तीन पक्षांमध्ये सरकार स्थापन झालेले असल्याने सोळंके यांना मंत्रिपदावर संधी मिळु शकली नव्हती. आता जिल्ह्यातीलच रिक्त झालेल्या मंत्रिपदावर प्रकाश सोळंके यांची वर्णी लावावी आणि त्यांना न्याय द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष अमोल जगताप, शहराध्यक्ष नितीन शिनगारे, गौतम चव्हाण यांनी केली आहे. तीन महिन्यापूर्वी महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका



संपन्न झाल्या. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी यंदा प्रकाश सोळंके यांना न्याय दिला जाईल असे सांगितले होते. परंतु महाराष्ट्रात तीन पक्षांचे महायुती सरकार स्थापन झाले. मंत्रीपद विभागली गेली त्यामुळे सोळंके यांना न्याय मिळू शकला नव्हता. आता जिल्ह्यातीलच रिक्त झालेल्या मंत्रिपदावर आ. प्रकाश सोळंके यांना संधी द्यावी अशी मागणी जोर धरू लागली आहे. प्रकाश सोळंके यांच्या प्रदीर्घ राजकारणाचा विधिमंडळातील कामकाजाचा अनुभव लक्षात घेता प्रकाश सोळंके हेच या मंत्रिपदाचे खरे दावेदार आहेत. त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी न्याय द्यावा अशी मागणी धारूर राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष अमोल जगताप, शहराध्यक्ष नितीन शिनगारे, गौतम चव्हाण यांनी केली आहे.




# काम दमदार पण प्रसिद्धीपासून लांब... विविध क्षेत्रातील महिलांची फिनिक्स गगनभरारी

## जागतिक महिला दिनानिमित्त सोमवारी आष्टी तालुका युवा पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कार देऊन करणार सन्मान

**आष्टी । प्रतिनिधी**

।समाजात काम करत असताना आपलं काम अन् आपण असा मनात निश्चय करून गेल्या अनेक वर्षापासून कुठलीही अपेक्षा न करता आपल्या क्षेत्रात दमदारपणे काम करून फिनिक्स पक्षाप्रमाणे आकाशात गगनभरारी घेऊन आपल्या कर्तत्वचा ठसा उमटविला. एक महिला असून ही आपले एक वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या आष्टी तालुक्यातील जिगरबाज व कर्तृत्ववान महिलांचा सोमवार दि १० मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आष्टी पंचायत समिती येथील सभागृहात सकाळी ११ वाजता आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार देऊन गौरव व सन्मान करण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याला मोठ्या संख्येने विविध क्षेत्रातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी केले आहे.

शहरात व ग्रामीण भागात विविध क्षेत्रात काम करून महिला नेहमीच पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून 'हम भी किसीसे कम नही' हे अनेक वेळा महिलांनी आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिले आहे. महिला ही जगात प्रत्येक क्षेत्रांमध्ये आघाडीवर आहेत मग ते क्षेत्र राजकीय असो किंवा शैक्षणिक औद्योगिक, सामाजिक असो किवा प्रशासकीय असो शेतीशी निगडीत असो. प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. अशाच काही महिलांचा ज्या प्रसिद्धीपासून कोसो दूर राहून पडद्या मागची भूमिका दमदार पणे पार पाडत आहेत.

या पुरस्कार सोहळ्याला उपविभागीय अधिकारी वसीमा शेख या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून तहसीलदार वैशाली पाटील, पोलिस उपविभागीय अधिकारी बाळकृष्ण हानपुडे, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, पोलिस निरीक्षक शरद भुतेकर, नगराध्यक्षा बेग मिर्झा आयशा इनायतुल्ला, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, मुर्शदपूर कासारी ग्रामपंचायतीच्या सरपंच शालिनी अशोक मुळे,नायब तहसीलदार बाळदत्त मोरे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, ग्रामीण रुग्णालय अधिक्षक डॉ चारूदत्त पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजेश तांदळे, केंद्रीय फिल्म सल्लागार समिती मंडळ सदस्य डॉ स्मिता बारवकर

महावितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंता कोमल शिंदे, डॉ प्रियांका सिंघण आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या सोहळ्याला जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित रहावे असे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष निसार शेख, सचिव जावेद पठाण, कार्याध्यक्ष अक्षय विधाते, संघटक समीर शेख, सहसचिव संतोष नागरगोजे,कार्यवाहक अतुल जवणे,गहिनीनाथ पाचबैल,कोषाध्यक्ष प्रेम पवळ, संतोष तांगडे, ड किशोर निकाळजे, सोपान पगारे,सल्लागार राजेंद्र लाड,संतोष दाणी,बा म पवार,अजय कापरे, विठ्ठल राख, ओंकार कदम, संस्कार लाड,मारूती संत्रे, सचिन पवार आदी परिश्रम घेत आहेत.




### राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्काराने सोमवारी यांचा होणार सन्मान

वैशाली मुकुंद साबळे (आदर्श माता ),रेखा भाऊसाहेब घुले(आदर्श शेतकरी महिला ),वंदना परिवंत गायकवाड (आदर्श महिला सरपंच), ब्रह्मकुमारी सुशिला बहेनजी (आध्यात्मिक समाजकार्यातील उत्कृष्ट महिला),कु.डॉ.शेख मेहविश आरा (आदर्श महिला वैद्यकीय अधिकारी), कीर्ती हांगे (आदर्श महिला शिक्षिका), ड स्वाती राजेंद्र जाधव (आदर्श शैक्षणिक व समाजकार्य ), श्रीमती कवडे अनिता साहेबराव (आदर्श ग्रामसेविका), अंकिता राजेंद्र जाधव ( आदर्श ग्राम महसूल अधिकारी), ज्ञानेश्वरी शंकर लांडे (आदर्श पशुधन पर्यवेक्षक महिला अधिकारी), ह भ प पुष्पाताई उमेश जगताप (उत्कृष्ट समाज प्रबोधनकार महिला), दिपाली अशोक काकडे (उत्कृष्ट खेळाडू), बावदाणकर संजीवनी सोपान (आदर्श कृषी सहाय्यक महिला), रुक्मिणी संपत मराठे (आदर्श अंगणवाडी सेविका), सुनिता रामदास जगताप (आदर्श आशा वर्कर), अंजली दिगंबर वाघमारे (उत्कृष्ट सुपरवायजर), सोनाली रुपेश उपाध्ये (उत्कृष्ट महिला उद्योजिका), ड पुष्पा भगत- गायकवाड (आदर्श महिला विधीज्ञ ), विजया मुळे (आदर्श समाज कार्य महिला) शिवनेरी महिला बचत गट पांढरी (आदर्श महिला बचत गट), वंदना सुरेश भैसाडे (आदर्श परिचारिका), वैष्णवी नामदेव रांगुळे (आदर्श कवियत्री), पूजा बिबीषण देवळकर- धोंडे (आदर्श महसूल सेविका), अर्चना सुभाष आरडे (उत्कृष्ट महिला पोलीस कर्मचारी), कल्पना गणेश पाटील (आदर्श सून ), सविता उगले (आदर्श सेविका), कोमल थेटे ( उत्कृष्ट रांगोळी महिला आर्टिस्ट), सुनिता नाथा शिंनगारे (उत्कृष्ट आशा वर्कर) या विविध क्षेत्रातील महिलांचा सोमवारी सकाळी ११ वाजता आष्टी पंचायत समिती सभागृहात महिला दिनानिमित्ताने शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व फेटा बांधून 'नारी सन्मान २०२५' हा पुरस्कार देऊन आष्टी तालुका युवा पत्रकार संघ गौरव करणार आहे.